# साहित्य चळवळीचा अमृत महोत्सवी सोहळा

## ग्रंथाभिसरण मंडळ,सार्वजनिक वाचनालय.अंबरनाथ

( ७५ वर्षे ग्रंथसेवेची, साहित्य सेवेची, वाचन परंपरेची,)

एखाद्या संस्थेच्या स्थापनेस ७५ वर्ष पूर्ण झाल्यास अमृत महोत्सव साजरा करतात. **अमृत महोत्सवी वर्ष** हे ७४ व्या वर्धापन दिनापासून ते ७५ व्या वर्धापन दिनापर्यंत साजरे केले जाते.

जेव्हा एखादा संकल्प उत्सवाचे रूप धारण करतो, तेव्हा त्यात अनेक लोकांचे संकल्प, ऊर्जा जोडली जाते. शतकाकडे वाटचाल करणाऱ्या या वाचनालयाच्या यशस्वी वाटचालीत अनेक साहित्यप्रेमी,रसिक वाचक,उत्साही कार्यकर्ते यांचा मोलाचा वाटा आहे. वाचनालयाच्या या यशस्वी वाटचालीच्या प्रवासात आपली सामाजिक बांधिलकी जपत सतत संस्थेच्या प्रगतीचा ध्यास धरणाऱ्या, संस्थेच्या स्थापनेपासून आजतागायत कार्यरत असणाऱ्या जुन्या व विद्यमान कार्यकारी मंडळातील पदाधिकारी व कर्मचारी वर्ग यांच्याही कार्याचा सहभाग तितकाच महत्वाचा आहे. सर्वांनी एकत्रित केलेल्या प्रयत्नामुळे संस्थेने सन १९४९ रोजी लावलेल्या रोपट्याचा, ७५ वर्षांचा वटवृक्ष आजही साहित्यप्रेमी वाचकांना आपली सेवा निरंतर देत आहे.

नव्या युगाची नवी जाणीव लक्षात घेऊन सन २०११ सालापासूनच संस्थेने आधुनिकीकरण कास धरत सर्व कामकाज संगणकीकृत पध्दतीने सुरू केले आहे. वाचनालयाने स्वत:ची ग्रंथालय आज्ञावली सुरू केली आहे. ग्रंथालयाच्या संकेतस्थळाचाही संस्थेचे सभासद लाभ घेत आहे. संस्थेकडून होतकरू व गरजू विद्यार्थ्यांसाठी नाममात्र शुल्कांत अभ्यासिकेची सोय व मोफत इंटरनेट सेवा दिली जात आहे.

सन १९४९ मध्ये स्थापन झालेल्या, अंबरनाथ शहरात साहित्य संस्कृती रूजावी,टिकावी आणि वाढावी या करिता सतत कार्यरत असणाऱ्या ग्रंथाभिसरण

मंडळ या सार्वजनिक वाचनालयाच्या, साहित्य संस्कृतीच्या चळवळीस ७५ वर्ष पुर्ण होत असून,यंदाचे सन २०२३ वर्ष हे वाचनालयाचे अमृत महोत्सवी वर्ष असल्याने वाचनालयकडून वर्षभर विविध साहित्यिक,सांस्कृतिक व सामाजिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. माझी माती माझा देश,ग्रंथपाल दिन,डिजिटल वाचन दिवस,बाल-कुमार ज्ञानकोपरा,पारंपारिक भोंडला इत्यादी विविध विषयांवरील कार्यक्रम उत्साहाने आयोजित करण्यात आले होते.

अमृत महोत्सवी वर्षांच्या औचित्याने ग्रंथाभिसरण मंडळ संस्थेने व किणीकर विकास प्रतिष्ठान यांच्या संयुक्त विद्यमाने दि. १ डिसेंबर ते ३ डिसेंबर २०२३ दरम्यान तीन दिवसीय अमृत महोत्सवी सोहळ्याचे आयोजन केले होते. या अमृत महोत्सवी सोहळ्याच्या निमित्ताने वेगवेगळ्या विषयांवरील व्याख्यानमाला / सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करण्यात आले होते.

शुक्रवार,दि.१ डिसेंबर २०२३ रोजी,

"भारतीयांचा प्राचीन ज्ञानखजिना"

प्रमुख वक्ते : डॉ.श्री.सच्चिदानंद शेवडे

शनिवार,२ डिसेंबर २०२३ रोजी,

"जीवनशैली बदलातून वेटलॉस आणि मधुमेह मुक्ती"

प्रमुख वक्ते - डॉ.श्री.जगन्नाथ दीक्षित

रविवार,३ डिसेंबर २०२३ रोजी

"शब्दांच्या गावा जावे"

सादरकर्त्या : सौ.दीपाली केळकर

पहिल्या दिवशी १ डिसेंबर २०२३ रोजी, डॉ.सच्चिदानंद शेवडे यांच्या " भारतीयांचा प्राचीन ज्ञानखजिना " या कार्यक्रमाने अमृत महोत्सवी सोहळ्यास प्रारंभ करण्यात आला.

डॉ.श्री.सच्चिदानंद शेवडे,आमदार श्री.बालाजी किणीकर,जिल्हा ग्रंथालय अधिकारी श्री.प्रशांत पाटील,संस्थेचे अध्यक्ष श्री.प्रवीण मथुरे व इतर मान्यवरांच्या हस्ते दिप प्रज्वलन करून कार्यक्रमाचे उद्‌घाटन करण्यात आहे. डॉ.सच्चिदानंद शेवडे यांनी आपल्या रोखठोक भूमिकेतून भारतीय प्राचीन ज्ञानाचा खजिना श्रोत्यांना उलगडून सांगितला.

दुसऱ्या दिवशी २ डिसेंबर २०२३ रोजी, डॉ.श्री.जगन्नाथ दीक्षित यांनी दैनंदिन जीवनशैली बदलातून वजन कमी कसे करावे व मधुमेह मुक्ती या विषयांवर मार्गदर्शन करून श्रोत्यांनी विचारलेल्या शंकाचेही उत्तम निरसन केले.

३ डिसेंबर रोजी सौ.दीपाली केळकर यांच्या “शब्दांच्या गावा जावे” या कार्यक्रमाने अमृत महोत्सवी सोहळ्याची सांगता करण्यात आली. दिपाली केळकर यांनी रसिक श्रोत्यांना शब्दांच्या नव्या गंमती जमती सांगत, दैनंदिन बोलीतील शब्दांचे शब्दसौंदर्य विशद करत कार्यक्रमात बहार आणून प्रेक्षकांना मंत्रमुग्ध केले.

दर्जेदार व प्रभावी वक्ते,विषयांचे वैविध्य यामुळे तीनही दिवस रसिक प्रेक्षक मोठ्या संख्येने या कार्यक्रमांमध्ये सहभागी झाले. ग्रंथाभिसरण मंडळाच्या या तीन दिवसीय अमृत महोत्सवी सोहळ्यास साहित्यप्रेमींनी भरघोस प्रतिसाद दिला.

# ग्रंथाभिसरण मंडळ, सार्वजनिक वाचनालय, अंबरनाथ

## अमृतमहोत्सवी वर्षाचे कार्यकारी मंडळ व कर्मचारी वृंद

| अ.क्र. | नाव | पद |
|---|---|---|
| १) | श्री. मथुरे प्रवीण मधुसूदन | - अध्यक्ष |
| २) | श्री. गोसावी प्रदीप प्रभाकर | - उपाध्यक्ष |
| ३) | श्री. हरहरे रविंद्र विश्वनाथ | - कार्यवाह |
| ४) | श्री.कर्वे प्रशांत अरविंद - | सहकार्यवाह |
| ५) | श्री. पाटणकर राघवेंद्र श्रीनिवास - | कोषाध्यक्ष |
| ६) | श्री. बोऱ्हाडे प्रमोद केरभाऊ - | कार्यकारणी सदस्य |
| ७) | श्री. नवार प्रदीप तुकाराम - | कार्यकारणी सदस्य |
| ८) | सौ.गोखले दिपा राजेश- | कार्यकारणी सदस्य |
| ९) | श्री.कुलकर्णी उमेश वामन - | कार्यकारणी सदस्य |
| १०) | श्री.शेंबेकर सुरेश मधुकर - | कार्यकारणी सदस्य |
| ११) | श्री.नेहेते विकास गुणवंत - | कार्यकारणी सदस्य |

### कर्मचारी वर्ग

१) सौ.संगिता हांडे (ग्रंथपाल)

२) सौ.राधा कुलकर्णी ( सहा.ग्रंथपाल)

३) कु.मिनल गाडवे (लिपिक)

४) विशाखा मुतालिक (ग्रंथालय सेविका)

५) निलिमा पंडित (ग्रंथालय सेविका )